<u>नियमीत दिवाणी दावा क्र.५०१/२०१६ मधील निशाणी ६० वरील आदेश</u>

(CNR No.MHOS-10001020-2016)

वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.६ सुषमा दिगांबर मोटे या मयत झाल्याने त्यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केला आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.६ सुषमा दिगांबर मोटे या दि.०६/०२/२०१९ रोजी मयत झाल्या आहेत. त्यांना अर्जात नमूद वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. करिता, मयत प्रतिवादी क्र.६ सुषमा दिगांबर मोटे यांचे वारस अभिलेखावर घेण्यास परवानगी मिळावी.

३. प्रतिवादी क्र.४ व ५ तर्फे विधीज्ञांनी अर्जाचे मागील बाजूस म्हणणे देऊन अर्जास विरोध केला आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, अर्ज कायदेशीर नाही. अर्जातील कारण सयुक्तिक नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा व जर न्यायालय अर्ज मंजूर करण्याचे निष्कर्षाप्रत आले, तर अर्ज वादीवर खर्च ठेवून मंजूर करण्यात यावा.

४. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. दोन्ही पक्षांतर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाची पडताळणी केली.

५. अभिलेखावरुन असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.६ सुषमा दिगांबर मोटे या दि.०६/०२/२०१९ रोजी मयत झाले आहेत. त्याबाबत मयत प्रतिवादी क्र.६ चे विधीज्ञांनी दि.१३/०९/२०१९ रोजी नि.क्र.३१ कडे पुरसीस दाखल केली आहे. प्रस्तुतचा अर्ज हा दि.०८/१२/२०२३ रोजी दाखल करण्यात आला आहे. प्रतिवादी क्र.६ सुषमा दिगांबर मोटे यांचे वारस अर्जात दर्शविल्याप्रमाणे आहेत, याकरिता वादीने शपथपत्र दाखल केले आहे.

६.        प्रस्तुत दावा हा वाद मिळकतीचे खरेदीखत होऊन मिळणेकरिता व निरंतर मनाई हुकूम मिळणेकरिता दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.६ सुषमा दिगांबर मोटे यांचे मृत्यूनंतर देखील सदरचा दावा त्यांच्या वारसांना चालविण्याचा अधिकार (Right to sue) हा टिकून राहतो. त्यामुळे मयत प्रतिवादी क्र.६ सुषमा दिगांबर मोटे यांचे कायदेशीर वारस अभिलेखावर आणण्याची आवश्यक कार्यवाही करणे गरजेचे आहे. त्यांचे अनुपस्थितीत दावा गुणवत्तेवर चालू शकणार नाही. तसेच नि.क्र.५८ वरील आदेशानुसार ''विलंब माफीचा'' व नि.क्र.५५ वरील आदेशानुसार ''दावा अपशम झालेला आदेश'' रद्द करण्याबाबतचा अर्ज मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे मयत प्रतिवादी क्र.६ सुषमा दिगांबर मोटे यांचे वारस अभिलेखावर घेण्याबाबतचा सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. करिता, खालील आदेश पारित करण्यात येतो :

## आ दे श

१) अर्ज मंजूर करण्यात येतो.

२) वादीने आवश्यक दुरुस्ती तात्काळ करावी व दाव्याची दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करावी.

३) नव्याने सामील करण्यात आलेल्या प्रतिवादी क्र.६/१ ते ६/३ यांना दिवाणी प्रक्रीया संहितेचे Form No.6, Appendix-B, First Schedule प्रमाणे समन्स काढण्यात यावे.

MOMIN HANIF MOINUDDIN
Digitally signed by MOMIN HANIF MOINUDDIN
Date: 2024.03.16 11:41:26 +0530

दिनांक : १५/०३/२०२४

**( एच.एम. मोमीन )**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
वाशी

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment / order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | A.A. Joshi, Stenographer, (Grade-III) |
| Court | --- | Jt. Civil Judge, J.D., Washi, Tal. Washi, Dist. Osmanabad |
| Date | --- | 15-03-2024 |
| Order signed by the presiding officer on | --- | 15-03-2024 |
| Order uploaded on | --- | 16-03-2024 |